# क्रियापदानी।

## अ. परोक्ष-भूतकाल:।

पूर्वी घडून गेलेली घटना दाखविण्यासाठी भूतकाळ वापरतात. संस्कृतमध्ये तीन प्रकारचे भूतकाळ आहेत.

१. प्रथम-भूतकाल: / अनद्यतन-भूतकाल:।

२. द्वितीय-भूतकाल: / अभ्यस्त /परोक्ष-भूतकाल:।

३. तृतीय-भूतकाल: / अद्यतन / सामान्य-भूतकाल:।

i. परोक्ष किंवा अभ्यस्त भूतकाळ वक्त्याच्या गैरहजेरीत पुष्कळ वर्षांपूर्वी घडून गेलेली घटना दाखविण्यासाठी वापरतात. म्हणून याची रूपे महाकाव्यांमध्ये अनेक ठिकाणी आढळतात.

ii. बोलणाऱ्याच्या गैरहजेरीत घडलेल्या घटना हा भूतकाळ सूचित करतो म्हणून यास 'परोक्ष' (अक्ष्णो: परं परोक्षम्।) (पर-पलीकडे) (अक्ष-डोळे) असे म्हणतात. नजरेच्या पलीकडे घडलेल्या घटना या भूतकाळाद्वारे सांगितल्या जातात.

iii. परोक्ष-भूतकाळाचे दोन प्रकार आहेत -

अ. अभ्यस्त किंवा द्वित्व परोक्ष भूतकाळ – यामध्ये धातूच्या पहिल्या व्यंजनाला द्वित्व होते.

ब. आमन्त परोक्ष भूतकाळ – यामध्ये धातूला 'आम्' प्रत्यय जोडून नंतर कृ, भू आणि अस् धातूंची परोक्ष भूतकाळाची रूपे जोडली जातात.

मात्र या उपप्रकाराची रूपे पुढील धातूंचीच असली पाहिजेत असा नियम आहे. १० व्या गणातील धातू, प्रयोजक धातू, दोन किंवा अधिक स्वर असलेले धातू आणि १ ते ९ गणांतील इ,उ,ऋ,ओ या स्वरांनी आरंभ होणारे धातू.

**परोक्ष भूतकाळाचे तृतीय पुरुषाचे प्रत्यय खालीलप्रमाणे.**

| | एकवचनम् | द्विवचनम् | बहुवचनम् |
|---|---|---|---|
| परस्मैपद (प.प) | अ | अतुस् (अतु:) | उस् (उ:) |
| आत्मनेपद (आ.प) | ए | आते | इरे |

## ब. द्वितीय-भविष्यत्काल:।

भविष्यकाळात घडणाऱ्या घटना दाखविण्यासाठी भविष्यकाळ वापरतात. संस्कृतमध्ये भविष्यकाळाचे दोन प्रकार आहेत.

**१. प्रथम - भविष्यत्काल:। (अनद्यतन)**

**२. द्वितीय - भविष्यत्काल:। (सामान्य / पूर्ण / अद्यतन / स्य)**

यांपैकी प्रथम भविष्यकाळ क्वचितच वापरला जातो. या विवेचनात केवळ द्वितीय भविष्यकाळी रूपांचाच विचार केला आहे. द्वितीय भविष्यकाळाची रूपे करताना प्रत्येक रूपात 'स्य' हे विकरण येते, म्हणून या भविष्यकाळाला 'स्य भविष्यकाळ' असेही म्हणतात.

धातूमध्ये 'स्य' मिसळल्यावर वर्तमानकाळी (धातूंचा पहिला गट) प्रत्यय जोडली जातात. परस्मैपदी धातूंना परस्मैपदी प्रत्यय आणि आत्मनेपदी धातूंना आत्मनेपदी प्रत्यय जोडले जातात. काही धातूची रूपे तयार करताना 'इ' आगम जोडला जातो.

**(भविष्यत्काल:।)**

| (प्रथम-भविष्यत्काल:) | (द्वितीय-भविष्यत्काल:) |
|---|---|
| (ता-भविष्यत्काल:) | (स्य-भविष्यत्काल:) |
| यांची रूपे क्वचित आढळतात. | यांची रूपे नित्य वापरली जातात. |

**द्वितीय-भविष्यकाळाची रूपे:**

| (परस्मैपद) | | | | (आत्मनेपद) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| एकवचनम् | द्विवचनम् | बहुवचनम् | पुरुष: | एकवचनम् | द्विवचनम् | बहुवचनम् |
| स्यामि | स्याव: | स्याम: | I (प्रथम:) | स्ये | स्यावहे | स्यामहे |
| स्यसि | स्यथ: | स्यथ | II (द्वितीय:) | स्यसे | स्येथे | स्यध्वे |
| स्यति | स्यत: | स्यन्ति | III (तृतीय:) | स्यते | स्येते | स्यन्ते |

## क. च्वि-रूपाणि।

नामांना क्रियापदे लावून तयार झालेल्या रूपांना 'च्वि-रूपे' म्हणतात.

व्याकरणाच्या परिभाषेनुसार हे समास असतात.

'च्वि' हा पाणिनीय प्रत्यय असून यामध्ये अकारान्त पदांना 'ई' जोडला जातो. 'अ' खेरीज इतर स्वर असतील तर आधीच्या स्वराचे दीर्घीकरण होते.

**रचना:**

पद + च्वि + अस् / भू / कृ धातूंची साहाय्यकारी रूपे = **च्वि-रूप**

**च्वि-रूपांचा अर्थ** –

अगोदर अस्तित्वात नसलेली एखादी गोष्ट 'अस्तित्वात येणे किंवा आणणे' असा अर्थ असताना आपण 'च्वि-रूपे' वापरतो.

उदा. स्पष्टीकरोति – पूर्वी अस्पष्ट होते, ते आता स्पष्ट झाले. अस्पष्टं स्पष्टं करोति स्पष्टीकरोति।

**पदपरिचय:।**

| क्र. | रूपम् | मूलधातु: | गण:, पदम् | च्वि-रूपम् | काल: / अर्थ: | पुरुष: | वचनम् |
|---|---|---|---|---|---|---|---|
| *१. | दूरीकुर्वन्ति | दूर + कृ | ८ उ.प. येथे प.प. | च्वि-रूपम् | वर्तमानकाल: | तृतीय: | बहुवचनम् |
| २. | स्पष्टीकरोति | स्पष्ट + कृ | ८ उ.प. येथे प.प. | च्वि-रूपम् | वर्तमानकाल: | तृतीय: | एकवचनम् |
| ३. | बहुलीभवन्ति | बहुल + भू → भव् | १ प.प. | च्वि-रूपम् | वर्तमानकाल: | तृतीय: | बहुवचनम् |
| ४. | लघूभवति | लघु + भू → भव् | १ प.प. | च्वि-रूपम् | वर्तमानकाल: | तृतीय: | एकवचनम् |
| ५. | दूरीकरोतु | दूर + कृ | ८ उ.प. येथे प.प. | च्वि-रूपम् | आज्ञार्थ: | तृतीय: | एकवचनम् |
| ६. | सफलीस्यात् | सफल + अस् | २ प.प. | च्वि-रूपम् | विध्यर्थ: | तृतीय: | एकवचनम् |

## ड. नामधातुः।

एखाद्या नाम अथवा विशेषणास क्रियापदासारखे हाताळले जाते. तेव्हा 'नामधातू' तयार होतो.

रचना:

नाम / विशेषणम् + अय + ति / ते = **नामधातोः क्रियापदम्।**

**वर्तमानकाळातील उदाहरणे.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मुखरयते | – | बोलण्यास लावतो. |
| २. | मन्दायते | – | मंद / आळशी होतो. |
| ३. | चिरायते | – | विलंब करतो. |
| ४. | कलहायते | – | भांडण करतो. |
| ५. | द्रुमायते | – | वृक्ष होतो / वृक्षासमान मानला जातो. |
| ६. | कृष्णायते | – | काळ करतो / कृष्णासमान वागतो. |
| ७. | गरुडायते | – | गरुड होतो / गरुडासमान मानला जातो. |
| ८. | सुरभयति | – | सुवासिक करतो. |
| ९. | धवलयति | – | शुभ करतो. |
| १०. | अन्धयति | – | आंधळे बनवितो. |
| ११. | मूकयति | – | मुके बनवितो. |

## इ. क्रियापदानां पृथक्करणम्। (कोष्टकपूरणम्)

### (६ पर्यायेषु ४ पर्याया: लेखनीय:।)

१. (जगाम, दद्याम्, करिष्याम:, अशक्नवम्, जानानि, तन्वे)

| द्वितीय-भविष्यत्काल: | परोक्ष-भूतकाल: | प्रथम-भूतकाल: | विध्यर्थ: | आज्ञार्थ: | वर्तमानकाल: |
|---|---|---|---|---|---|
| **करिष्याम:** | **जगाम** | **अशक्नवम्** | **दद्याम्** | **जानानि** | **तन्वे** |

२. (कुर्यात्, उवाच, पठति, गृहाण, भविष्यन्ति, अशृणवम्)

| द्वितीय-भविष्यत्काल: | परोक्ष-भूतकाल: | प्रथम-भूतकाल: | विध्यर्थ: | आज्ञार्थ: | वर्तमानकाल: |
|---|---|---|---|---|---|
| **भविष्यन्ति** | **उवाच** | **अशृणवम्** | **कुर्यात्** | **गृहाण** | **पठति** |

३. (अरमत, यतिष्यसे, भवेत्, ययौ, रचयामि, जानातु)

| द्वितीय-भविष्यत्काल: | परोक्ष-भूतकाल: | प्रथम-भूतकाल: | विध्यर्थ: | आज्ञार्थ: | वर्तमानकाल: |
|---|---|---|---|---|---|
| **यतिष्यसे** | **ययौ** | **अरमत** | **भवेत्** | **जानातु** | **रचयामि** |

४. (तन्वन्तु, अभुञ्जत, गृह्णीयाम, गमिष्यामि, मन्यते, बभूवु:)

| द्वितीय-भविष्यत्काल: | परोक्ष-भूतकाल: | प्रथम-भूतकाल: | विध्यर्थ: | आज्ञार्थ: | वर्तमानकाल: |
|---|---|---|---|---|---|
| **गमिष्यामि** | **बभूवु:** | **अभुञ्जत** | **गृह्णीयाम** | **तन्वन्तु** | **मन्यते** |

५. (चकार, आप्नवानि, लिखसि, पास्यति, दद्यु:, अभवत्)

| द्वितीय-भविष्यत्काल: | परोक्ष-भूतकाल: | प्रथम-भूतकाल: | विध्यर्थ: | आज्ञार्थ: | वर्तमानकाल: |
|---|---|---|---|---|---|
| **पास्यति** | **चकार** | **अभवत्** | **दद्यु:** | **आप्नवानि** | **लिखसि** |